बातम्या, लेख व जाहिरातीसाठी
लातूर समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२ व ९१७२३२५७०८

। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक १५२ वा । शनिवार दिनांक २३ ऑगस्ट, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १.५० ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- जिल्ह्यात अवैध मद्य विरोधी कारवाई करण्यात आली असून पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, नळदुर्ग पोलीस ठाणे अंतर्गत जालिंदर रा. येडोळा ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.२१.०८.२०२५ रोजी लोहगावचे हद्दीत हणमंत बनसोडे यांचे शेताचे शेजारी असलेल्या ओढा पात्रालगत अंदाजे १,०८,००० किंमतीची १,८०० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

मुरुम पोलीस ठाणे अंतर्गत मुबारक रा. यशवंत नगर मुरुम ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.२१.०८.२०२५ रोजी यशवंतनगर कडे जाणारे रोडलगत पश्चिम बाजूच्या पत्राचे शेडसमोर मुरुम येथे अंदाजे ४,००० किंमतीची ४० लिटर गावठी दारु विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये मुरुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

शिराढोण पोलीस ठाणे अंतर्गत विमल झोपडपट्टी शिराढोण ता. कळंब जि. धाराशिव या दि.२१.०८.२०२५ रोजी आपल्या राहत्या घरासमोर शिराढोण येथे अंदाजे ५,८०० किंमतीची १०० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव व गावठी दारु ३० लिटर अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये शिराढोण पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

## ऑनलाईन गेमिंगच्या जीवघेण्या मोहजाळातून तरुणाई वाचणार
## - खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर ओमराजे यांच्या प्रयत्नाला यश



धाराशिव (प्रतिनिधी)- तंत्रज्ञानामुळे व्यक्तींचे जिवन सुसाहय होत असताना तरुण पिढीच्या हातात मोबाईल आला मोबाईल सोबतच त्याची काळी बाजू असणाऱ्या अनेक गोष्टी आल्या. यामुळे तरुण पिढी वाईट अशा ऑनलाईनवर उपलब्ध असणाऱ्या विविध गेमच्या आहारी जावून नैराश्यात आत्महत्यासारख्या पाऊल उचलू लागला. आई वडीलांनी व कुटुंबियांनी लहानाचा मोठा केलेला घर संभाळणारा व्यक्ती जंगली रमी, ड्रीम -११, रमी सर्कल, ऑनलाईन तीन पत्ती, ऑनलाईन पोकर, लकी चिकन रोड, चक्री यासारख्या ऑनलाईन गेमच्या फसव्या जाहीरातीस भूलून लवकर श्रीमंत होण्याचे स्वप्ने पाहू लागला. यातच आपण नकळत ऑनलाईन गेमच्या मोहजाळात आडकत गेलो आहे. हे लक्षात आल्यानंतर डोक्यावर प्रचंड कर्ज झाल्याची जाणीव त्यास आत्महत्याकडे घेवून गेली. दि. १६/०६/२०२५ रोजी धाराशिव जिल्हयातील बावी कावलदरा येथील तरुण लक्ष्मण जाधव याने या ऑनलाईन गेमच्या व्यसनामुळे झालेल्या कर्जाच्या नैराश्यातून स्वत:चे कुटुंब विष देवून संपविले व स्वत: गळफास घेवून आत्महत्या केली. या आगोदर कुर्डुवाडी येथील तरुणाने अशाच पध्दतीच्या गेमच्या व्यसनापायी ८ एकर जमीन व दोन ट्रॅक्टर विकल्याची घटना घडली होती ही दोन प्रातीनिधीक उदाहरणे असून महाराष्ट्रातच नव्हे तर संपुर्ण देशभरात ऑनलाईन जुगाराच्या मोहातून अनेक तरुणांनी जिवन संपविल्याच्या घटना घडल्या आहेत.

खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या संवेदनशिल मनास ही गोष्ट अस्वस्थ करत होती. माझा तरुण कुठेतरी ऑनलाईन व्यसनापायी भरकटत असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांनी या अनुषंगाने शुन्य प्रहार काळामध्ये लोकसभेच्या अधिवेशनात केंद्र सरकारचे अत्यंत महत्वपुर्ण अशा सामाजिक प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधले. यातच उशीरा का होईना झोपी गेल्याचे सोंग घेणारे भाजप सरकार जागे झाले व सर्व प्रकारच्या ऑनलाईन गेमवर बंदी घालणारा कायद्याचा मसुदा लोकसभेच्या पटलावर ठेवला. यापुर्वी आ. कैलास पाटील यांनी देखील या प्रश्नाच्या अनुषंगाने विधासभेच्या पावसाळी अधिवेशन काळात या विषयावर प्रश्न उपस्थित केला होता. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाच्या जनतेच्या प्रश्नाशी प्रामाणिक राहून काम करणाऱ्या खासदार व आमदार यांच्या प्रयत्नास यश येताना दिसत आहे.

ऑनलाईन गेमवर बंदी घालणारा कायदा अस्तीत्वात आल्यास तरुण वर्ग आपोआपच या प्रकारच्या व्यसनापासून दुर राहील व आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलणार नाही. आई वडीलांनी मोठी स्वप्नी पाहात मोठा केलेला मुलगा वृध्दापकाळात त्यांचा आधार राहील. अनेक कुटुंबे ऑनलाईन गेमच्या जुगारामुळे नष्ट होण्यापासून सावरतील यात शंका नाही.

खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी केंद्र शासनातील मंत्री अश्विनी वैष्णव यांचे सदर बंदी कायद्याबद्दल आभार मानले आहेत.

## पवनचक्कीची अ‍ॅल्युमिनियम तार चोरीचे एकूण सहा गुन्हे उघड

धाराशिव (प्रतिनिधी)- दिनांक २१/०८ रोजी माला विषयीचे गुन्हे उघडकीस आणणे अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि कासार व पथक हे पेट्रोलिंग करत असताना पथकास माहिती समजली की, संशयित विशाल रामा काळे वय २१ वर्ष रा. पारधी पिढी भुम, जिल्हा धाराशिव याच्याकडे चोरीचा मुद्देमाल असुन सदर मुद्देमाल तो विक्रीकरिता घेऊन जाणार आहे. अशी बातमी मिळाल्यावर सदर आरोपीस त्याचे पिकअप सह सिताफिने ताब्यात घेऊन तपासणी केली असता त्याचे वाहनात अल्युमिनियम तारेचे बंडल असल्याचे दिसून आले त्याचे कडे सदर बाबत चौकशी केली असता त्याने सदरच्या ॲल्युमिनियम च्या तारा कळंब व वाशी तालुक्यातील बावी, सरमकुंडी, मस्सा शिवारातून पवनचक्कीच्या खांबांवरून चोरी केलेल्या असल्याची कबुली दिली . त्यावरून धाराशिव जिल्हा गुन्हे अभिलेख तपासला असता अशा प्रकारच्या चोरीचे ०६ गुन्हे दाखल असल्याचे दिसून आले. त्यावरून तात्काळ पंचनामा करून एकूण ८९८ मीटर लांबीच्या ०२,६९,४०० रुपये किमतीच्या ल्युमिनियमच्या तारा आणि गुन्ह्यात वापरलेले पिकअप वाहन किंमत ५,००,००० रुपये असा एकूण ०७,६९,४०० रुपये किमतीचा मुद्देमाल पंचनामा करून जप्त करण्यात आला आहे. आरोपीकडे केलेल्या चौकशीत त्याने त्याच्या अन्य साथीदारांची नावे तसेच चोरी केलेल्या मुद्देमालाबाबत माहिती दिली आहे. त्याने दिलेल्या माहितीवरून धाराशिव जिल्ह्यातील पवनचक्कीच्या ल्युमिनियम तारा चोरीचे एकूण ०६ गुन्हे उघडकीस आले आहेत. ताब्यात असलेल्या आरोपीने त्याच्या अन्य साथीदाराच्या मदतीने सदरचे गुन्हे केल्याचे कबुली दिल्याने त्याची वैद्यकीय तपासणी करून रिपोर्ट सह पोलीस ठाणे, वाशी येथे पुढील कारवाई कामी हजर केले आहे.

सदरची कामगीरी अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना. यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार, पोलीस हावलदार शौकत पठाण, प्रकाश औताडे, फराहान पठाण, चालक पोलीस अमंलदार रत्नदीप डोंगरे, नागनाथ गुरव यांच्या पथकाने केली आहे.

## स्त्री सक्षमीकरणावर परिसंवादाचे आयोजन

धाराशिव - इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत सन २०२५ हे पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे.त्यानिमित्त सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय,धाराशिव यांच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे स्त्री सक्षमीकरणावर आधारित परिसंवाद व व्याख्यानाचे २१ ऑगस्ट रोजी आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व व्याख्याते प्रा.भैरवनाथ कानडे होते तर अध्यक्षस्थानी सहाय्यक संचालक श्री.अमोल ताकभाते होते. धाराशिव जिल्ह्यातील सुमारे २०० ते २५० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी या परिसंवादात सहभाग नोंदविला.

प्रा.कानडे यांनी आपल्या व्याख्यानात पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला व स्त्री सक्षम आणि सशक्त कशी राहावी याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निरीक्षक श्री.युवराज भोसले, श्री.संदेश घुगे,वरिष्ठ लिपिक श्री.विकास राठोड तसेच कार्यालयातील इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## धार्मिक सौहार्दाचे धाराशिवकरानी पुन्हा घडविले दर्शन; विसर्जन मिरवणुकीनंतर तिसऱ्या दिवशी जुलुस!



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- ईद-ए-मिलादुन्नबी अर्थात इस्लाम धर्माचे संस्थापक मोहम्मद पैगंबर यांची जयंती आणि गणरायाची विसर्जन मिरवणूक एकाच दिवशी ५ सप्टेंबर रोजी येत असल्यामुळे गणेश विसर्जन मिरवणुकीनंतर तिसऱ्या दिवशी ८ सप्टेंबर रोजी जुलूस काढण्याचा निर्णय ईद-ए-मिलादुन्नबी कमिटीने घेतला आहे. धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ति किरण पुजार आणि जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती शफाकत आमना यांच्या विनंतीनंतर हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाने धाराशिवकरानी पुन्हा एकदा देशाला धार्मिक सौहार्दाचे दर्शन घडविले आहे. ईद-ए-मिलादुन्नबी कमिटीने प्रशासनाला कळविलेल्या माहितीनुसार, ५ सप्टेंबर रोजी पैगंबर जयंतीचे सर्व धार्मिक कार्यक्रम पूर्वनियोजित प्रमाणेच होतील. मिरवणूक मात्र ८ सप्टेंबर रोजी काढण्यात येणार आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही शहरात ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त १२ दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. जयंती निमित्त अरब मस्जिद ते दर्गा अशी पारंपरिक मिरवणूक देखील काढली जाते. परंतु गणेश विसर्जन मिरवणूक आणि पैगंबर जयंती मिरवणूक एकाच दिवशी ५ सप्टेंबर रोजी येत असल्यामुळे ईद-ए-मिलादुन्नबी कमिटीने मिरवणुकीच्या तारखेत बदल करून ८ सप्टेंबर रोजी मिरवणूक काढण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेन्द्र मिश्र यांनी देखील कौतुक केले असून पोलीस प्रशासन व कमिटी यांच्यातील समन्वयाबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी ईद-ए-मिलादुन्नबी कमिटीचे अध्यक्ष इर्शाद सय्यद, कार्याध्यक्ष अजहर पठाण, मसूद शेख, वाजीद पठाण, बाबा मुजावर, इस्माईल शेख, मैनोद्दीन पठाण, धनंजय शिंगाडे, अमोल सुरवसे, समी मशायक, खलील पठाण उपस्थित होते.

## इस्त्राईलमध्ये युवकांना रोजगाराची संधी नॉन वॉर झोनमध्ये घरगुती सहायक क्षेत्रात युवक-युवतींना नोकरी उपलब्ध

धाराशिव (जिमाका)- इस्त्राईलमध्ये नॉन वॉर झोनमध्ये घरगुती सहायक (केश इरीशव उरीशसळींशी) क्षेत्रातील आरोग्य विभागात ५ हजार कर्मचाऱ्याची मागणी करण्यात आली असुन युवक-युवतींना नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. मित्र या संस्थेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासह बांधकाम, आरोग्य व इतर क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करण्यावर भर देण्यात येत आहे. इस्त्राईलमध्ये (नॉन वॉर झोन) रोजगार उपलब्ध् करून देण्यासाठी मित्र संस्थेने विविध विभागाशी समन्वय साधून सदर उपक्रम संयुक्तरित्या राबविण्यासाठी संवाद सुरू केला आहे.

काळजीवाहू (घरगुती सहाय्यक) सेवांसाठी निपुण/पारंगत,भारतीय नियामक प्राधिकरणाद्वारे मान्यताप्राप्त असलेले व किमान ९९० तासांचा कोर्स पूर्ण केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक (including OJT),

भारतीय प्राधिकरणादद्वारे प्रदान केलेल्या मिडवाइफरी मधील प्रशिक्षण,संबंधित भारतीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली किंवा नर्सिंग,फिजिओथेरपी,नर्स असिस्टंट मधील प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक,तसेच GDA/ANM/GNM/BSe Nursing/ PostBSc Nursing शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे.इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान असावे.वय २५ ते ४५ वर्षे वयोगटातील उमेदवार या योजनेत सहभागी होण्यास पात्र आहेत.

इस्त्राईलमध्ये नोकरी मिळवण्यासाठी महाराष्ट्रातच निवड प्रक्रिया व नियुक्तीचे वाटप,आरोग्य तपासणी, व्हिजा आणि पासपोर्टसाठी संपूर्ण मार्गदर्शन व मदत NSDC कडून केली जाणार आहे. मेडिकल विमा, राहण्याची आणि जेवणाची सोयही असणार आहे.उमेदवारांना १ लाख ३१ हजारापर्यत मासिक वेतन दिले जाईल. तरी जास्तीत जास्त उमेदवारांनी https://maharashtrainternational.com/jobDetail.aspx या अधिकृत संकेतस्थळाला आपली इच्छुकता नोंदविणे आवश्यक आहे. माहितीसाठी दुरध्वनी (०२४७२)-२९९४३४ वर संपर्क साधावा असे आवाहन सहायक आयुक्त,जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,धाराशिव यांनी केले आहे.

## जीवन सुंदर आहे, युवकांनी व्यसनापासून दूर रहा - राजशेखर शिवाचार्य महास्वामी



मुरूम (रामलिंग पुराण)- उमरगा तालुक्यातील मुरूम येथे पाटील परिवाराच्या पुढाकाराने स्वनिधीतुन श्री सिद्धयप्पा मंदिराचे जीर्णोद्धार सोहळा असंख्य भाविकांच्या उपस्थितीत भक्तीमय वातावरनात पार पडला.. जीवन सुंदर आहे, हे जीवन पुन्हा नाही म्हणत यवकांनी व्यसनापासून दूर रहावे असे अवहान यावेळी नंदगाव मठाचे मठादीपती श्री म नि प्र राजशेखर शिवाचार्य महास्वामी यांनी केले.

तालुक्यातील स्वातंत्र्यपूर्व काळातील मुरुम येथील सिध्दयाप्पा देवस्थानचा पाटील परीवाराच्या वतीने जिर्णोध्दार करण्यात आला आहे. सुंदर कलाकृतीने साकारलेल्या मंदिरात बुधवारी ष. ब्र. जयमल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते शिवलिंग प्राण प्रतिष्ठापणा व अभिषेक सोहळा संपन्न झाला. यानिमित्त दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून असलेल्या पुरातन काळातील व मागील अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या मुरुम शहरातील श्री सिध्दयाप्पा मंदिराच्या जिर्णोध्दार करण्यात आला आहे. ४५५० स्क्वेअर फूट वसलेल्या दोन मजली मंदिराचे जिर्णोध्दार, सभामंडपाचे काम काशी, श्रीशैल्यम व उजैन पिठाचे विश्वस्त तथा जिल्हा बँकेचे चेअरमन तथा मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष बापुराव पाटील व पाटील परिवाराने स्वनिधीतुन करण्यात आले आहे. मंदिराच्या कामासाठी कर्नाटक राज्यातील बदामी व बनशंकरी येथुन लाल कोरीव दगड व शिल्प मागवण्यात आले. अप्रतिम कलाकारी असलेल्या देखण्या मंदिरात बुधवारी (दि.२०) पहाटे ५ वाजता नारळी मठाचे श्री ष. ब्र. जय मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते शिवलिंग प्राण प्रतिष्ठापणा व अभिषेक संपन्न झाला. यावेळी श्री. म. नि. प्र. राजशेखर महास्वामीजी, विरक्तमठ, नंदगाव, मुरुम येथील चरमूर्ती मठाचे श्री. म. नि. प्र. सिद्धमल्ल महास्वामीजी व केसरजवळगा मठाचे श्री. म. नि. प्र. श्री. विरंतेश्वर महास्वामीजी यांचे आर्शीवचन लाभले. याप्रसंगी बोलताना पुढे म्हणाले सद्याची युवापिढी व्यसनाच्या आहारी गेली असून आपले संस्कार विसरली आहे त्यांना शिक्षणाबरोबर संस्काराचीही गरज असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाश भोसगे, दत्ता बिराजदार, प्रदीप दिंडेगावे,शिवराज पाटील, शंभूलिंग पाटील, श्रीकांत बेंडकाळे, खडू झूरळे,ओमकार पाटील, शिवा दुर्गे, गणेश अंबर, रणजित राजपूत, सिद्धू नागोबा,दिंगबर खुने,संजय कारभारी, नागराज कारभारी आदीनी परिश्रम घेतला. यावेळी असंख्य भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाटील परिवाराच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते हजारो भविकांनी महाप्रसदाचा लाभ घेतला...

## अनुसूचित जाती व नवबौद्ध बचत गटांसाठी मिनी ट्रॅक्टर अनुदान योजना २९ सप्टेंबरपर्यंत अर्ज मागविले

धाराशिव दि.२२ ऑगस्ट (जिमाका) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहायता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने (कल्टीव्हेटर/ रोटॅव्हेटर व ट्रेलर) खरेदीसाठी कमाल ३.१५ लक्ष रुपयांपर्यंतचे अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे.

या योजनेसाठी बचत गटातील किमान ८० टक्के सदस्य अनुसूचित जाती प्रवर्गातील असणे,गट नोंदणीकृत असणे व खाते राष्ट्रीयकृत बँकेत असणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील पात्र बचत गटांनी अर्जासह आवश्यक कागदपत्रे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय,धाराशिव येथे २९ सप्टेंबर २०२५ पर्यंत ऑफलाईन स्वरूपात सादर करावेत,असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी केले आहे.

